द्वितीय सत्रात स्त्री चळवळीतील आघाडीच्या नागपूर येथील कार्यकर्त्या सौ. मीरा कडबे यांनी महिला सक्षमीकरण विकास वर्तमान स्थिती व पुढील दिशा या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आर्थिक दृष्ट्या सबळ झाल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटू शकणार नाहीत. परंतु त्यानंतरही स्त्री स्वतंत्र असतेच असे नाही. ग्रामीण महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून भरपूर प्रगती केली आहे. पण आजही पुरुषाच्या वर्चस्वाखाली स्त्री आहे. स्त्रियांच्या मानवी अधिकारांचा ज्यावेळेस संपूर्ण समाज आणि स्वयं स्त्री पुरस्कार करेल त्यावेळीच सबलीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली, असे म्हणता येईल. असे त्या म्हणाल्या. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अरविंद देशमुख हे होते.

कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या सौ. संगीता पवार आपल्या मनोगतात म्हणाल्या की, सामाजिक समता निर्माण होण्यासाठी फक्त स्त्रियांनाच प्रयत्न करून चालणार नाही.

तर त्यात पुरुषांचाही तेवढाच सहभाग असणे आवश्यक आहे. यावेळी प्रमुख पाहुण्या पुष्पा उरकुडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेचे संचालन वैष्णवी डफळे, रोषणी डोंगरे यांनी तर प्रास्ताविक डॉ. मनीषा जोशी यांनी केले. आभार डॉ. विभा देशपांडे यांनी मानले. यावेळी श्रीधर पवार, कु. ज्योती कठाणे, ऋजुता हमले, अपर्णा पोकळे, शुभांगी राऊत आदी प्रामुख्याने उपस्थित होते. ऋजुता आमले व अमृता पिंपळे यांना निबंध स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धेचे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

Principal
Arts & Sci. College
Kurha

Science College
160
KURHA

※ कार्यक्रम पत्रिका ※

शुक्रवार, दि. १२ ऑक्टोबर २०१८

सकाळी ९.00 ते १0.३0	प्रतिनिधी नोंदणी
सकाळी १0.३0 ते १२.३0	उद्घाटन समारंभ
समारंभाचे अध्यक्ष	मा. श्री. अरुणभाऊ अडसड अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे
उद्घाटक	मा. सौ. निताताई ठाकरे सदस्या, महाराष्ट्र राज्य (विदर्भ) महिला आयोग, मुंबई
प्रमुख उपस्थिती	मा. प्रा. डॉ. सौ. अलका गायकवाड भारतीय महाविद्यालय, अमरावती मा. श्री घनश्यामजी मेश्राम सचिव, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे मा. श्री. सुरेशभाऊ मुंधडा संचालक, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे मा. श्री. प्रतापदादा अडसड नगराध्यक्ष, नगरपरिषद धामणगाव रेल्वे मा. श्री. विजय डहाके सदस्य, महाविद्यालय विकास समिती, कुन्हा मा. डॉ. अरविंद व. देशमुख प्राचार्य, कला व विज्ञान महाविद्यालय, कुन्हा

दुपारी १.00 ते २.00	प्रथम सत्र
प्रमुख वक्ते	ॲड. प्रा. डॉ. वर्षा देशमुख डॉ. पंजाबराव देशमुख विधी महा. अमरावती.
विषय	"महिलांच्या सुरक्षिततेसाठी विविध कायदे"
दुपारी २.00 ते ३.00	अवकाश
दुपारी ३.00 ते ४.00	द्वितीय सत्र
प्रमुख वक्ते	मा. सौ. मिराताई कडबे स्त्री चळवळीतील आघाडीच्या कार्यकर्त्या, नागपूर
विषय	"महिला सक्षमीकरण, विकास वर्तमान स्थिती व पुढील दिशा"
दुपारी ४.00 ते ४.१0	अवकाश
दुपारी ४.१0 ते ५.00	समारोप
अध्यक्ष	प्राचार्य मा. डॉ. अरविंद व. देशमुख
प्रमुख उपस्थिती	मा. डॉ. अर्चनाताई रोठे मुख्य कार्यकारी अधिकारी, गजानन सहकारी सुतगिरणी, धामणगाव रेल्वे मा. सौ. संगीताताई पवार, कुन्हा मा. पुष्पाताई उरकुडे, कुन्हा श्री नितीन धांदे सदस्य, महाविद्यालय विकास समिती, कुन्हा)

Arts & Science College 160 KURHA

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

यांच्या सहयोगाने

श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे द्वारा संचालित,

कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

ता. तिवसा जि. अमरावती ४४४७०१

नॅक द्वारा 'ब' दर्जा मानांकित

एक दिवसीय कार्यशाळा

"महिलांविषयी कायदे"

विषय – भारतातील महिलांची वर्तमान, सामाजिक व आर्थिक स्थिती : महिलांचे सक्षमीकरण, विकासाची वास्तविकता व पुढील दिशा

प्रमाणपत्र

नाव - _____

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे सहयोगाने कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा येथे "भारतातील महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती : महिलांचे सक्षमीकरण, विकासाची वास्तविकता व पुढील दिशा" या विषयावर दि. १२/१०/२०१८ ला आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये आपण सहभाग घेतला. करिता आपणांस सन्मानपूर्वक हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. विभा प्र. देशपांडे समन्वयक, महिला समिती कला व विज्ञान महा. कुऱ्हा	डॉ. निशा सु. जोशी सह समन्वयक, महिला समिती कला व विज्ञान महा. कुऱ्हा	डॉ. अरविंद व. देशमुख प्राचार्य कला व विज्ञान महा. कुऱ्हा	मा. अरुणभाऊ जी. अडसड अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था, धा. रे.

Arts & Science College 160 KURHA

गावात मतदान जागृती करतांना विद्यार्थीनी.

राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतांना मा. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख व इतर मान्यवर.

Arts & Science College
160
KURHA

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १५० व्या जयंती निमित्य आयोजित वक्तृत्व स्पर्धेत मार्गदशन करतांना डॉ. स्मिता जाधव



मतदार नोंदणी संबंधी मार्गदर्शन करतांना तिवसा येथील तहसिलदार व त्यांची चमु.

Arts & Science College 160 KURHA

Principal
Arts & Sci. Colleg
Kurha

2018-19

" काळागोटा" – (पारधी बांधवांसोबत अनोखे दीपावली स्नेहमिलन)

ज्या समाजामध्ये आपण राहतो त्या समाजातील आपल्या पैकीच एक बांधव दुर्लक्षित राहतात. अशा बांधवांना आपल्यातील मानून त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे इतरांसारखे आपण देखील स्वाभिमानाने जीवन जगू शकतो हा आत्मविश्वास निर्माण व्हावा या करिता महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये समाज भान निर्माण व्हावे म्हणून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राबविण्यात येणारा अभिनव उपक्रम म्हणजे दीपावलीचे औचित्य साधून धनत्रयोदशी या दिनी पारधी बेडा काळा गोटा येथे दीपावली स्नेहमिलन सोहळा सातत्याने गेल्या चार वर्षापासून राबविण्यात येतो. काळा गोटा हे अमरावती जिल्ह्यातील तालुका तिवसा मधील पारधी लोक वस्तीचे छोटेशे गाव. या लोक वस्तीत संपूर्ण स्वच्छतेचा अभाव, लोकांमध्ये शिक्षणाबद्दल असलेली कमालीची उदासीनता, व्यसनाधीनता, अंधश्रद्धाआणि इतर सामाजिक कुप्रथा यामुळे या वस्तीतील लीकांची जीवनशैली सर्व सामन्यांच्या तुलनेत अतिशय वेगळी आढळून येते. अशावेळी या पारधी बांधवांमध्ये जागृती घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालय दरवर्षी या ठिकाणी भेट देते. व प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

या वर्षी दि. ०३/११/२०१८ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी, प्राध्यापक यांनी दीपावली स्नेहमिलन सोहळा काळा गोटा येथे साजरा केला. बेड्यावरील प्रत्येक घराला भेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छासह फराळाचे वितरण केले. सातत्याने सुरु असलेल्या या उपक्रमाबद्दल पारधी बांधवांनी महाविद्यालायाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. दिवाळीसारख्या सणाचा आनंद स्वतःपुरता मर्यादित न ठेवता त्या आनंदामध्ये समाजातील उपेक्षित असणाऱ्या बांधवांसोबत महाविद्यालयाच्या माध्यमातून तो साजरा होतो यापासून मिळणारे आत्मिक समाधान आमच्याकरिता फार मोठे आहे.

Arts & Science College 160 KURHA

दीपावली निमित्य फराळाचे वाटप करतांना

दीपावली स्नेहमिलन सोहळ्यानिमित्य जमलेल्या पारधी भगिनी

Arts & Science College 160 KURHA

2018-2019

विधायक

कला व विज्ञान महाविद्यालयाने घेतला पुढाकार, मिठाई फराळाचे करण्यात आले वितरण

पारधी बेड्यावर रासेयोतर्फे स्नेहमिलन

प्रतिनिधी । कुन्हा

धामणगाव रेल्वे येथील श्रीराम शिक्षण संस्थाद्वारा संचालित कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परिसरातील काळागोटा येथील पारधी बेड्यावर नुकताच दीपावली स्नेहमिलन सोहळा उत्साहात पार पडला. पारधी बेड्यावरील रहिवाशांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी रासेयो स्वयंसवेकांनी पुढकार घेऊन संपूर्ण परिसर स्वच्छ केला. त्यानंतर पारधी बंधू व भगिनींचे उद्बोधन करण्यात आले. दिवाळीनिमित्त मिठाई व फराळाचे वितरण केले. हळूहळू का होईना आमच्यामध्ये बदल घडेल, असा विश्वास या प्रसंगी पारधी बांधवांनी व्यक्त केला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जाधव, प्रा. रंजनसेन शेंडे, नितीन घांडे, अक्षय उगवकर, शुभम बावणे, शुभम नरोडे, मोनिका वैद्य, रोशनी डोंगरे, अमृता पिंपळे, अनुश्री जिरापुरे, प्रियंका पाथरे आदींसह रासेयो स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले. उपक्रमासाठी काळागोटा येथील ग्रामस्थांचेही विशेष सहकार्य लाभले.उपक्रमासाठी रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

पारधी बेड्यावरील रहिवाशांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यास रासेयो स्वयंसवेकांनी पुढाकार घेत परिसर स्वच्छ केला. त्यानंतर मिठाई व फराळाचे वितरण केले.

रासेयो स्वयंसेवकांची पारधी बेड्यावर दिवाळी

- कला व विज्ञान महाविद्यालयाचा उपक्रम
- स्वच्छता अभियानही राबविले

वार्ताहर / १३ नोव्हेंबर

कुन्हा : धामणगांव रेल्वे येथील श्रीराम शिक्षण संस्थेद्वारा संचालित कुन्हाच्या कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी काळागोटा येथील पारधी बेड्यावर दिपावली स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. रासेयोच्या उद्दीष्टानूसार वंचितांनाही समाजाच्या आनंदी क्षणात सामावून घेण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पारधी बेड्यावर या स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

स्वच्छता अभियानाने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. रासेयो स्वयेसेवक आणि गावातील तरूणांनी संपूर्ण गावाची स्वच्छता केली. यावेळी ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, डॉ. सुनील आखरे, प्रा. हर्षा कांबि, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जाधव, प्रा. अजय अभ्यंकर, डॉ. किर्ती गांधी प्रामुख्याने उपस्थित होते. प्राचार्यांसह सर्व प्राध्यापक आणि रासेयो स्वयंसेवकांनी काळागोटा पारधी बेड्यावरील प्रत्येक घराला यावेळी भेट दिली आणि दिवाळीच्या शुभेच्छांसह त्यांना फराळाचे वितरण केले.

कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकातर्फे चौन वर्षापासून दिवाळीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याबद्दल गावकऱ्यांनी महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि रासेयो स्वयंसेवकांचे कौतूकही केले. यावेळी काळागोटा पारधी बेड्यावरील धनाजी पवार, रोमण पवार, जीवन पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आमच्या समाजाबद्दल लोकांचे अनेक पूर्वग्रह आणि गैरसमज आहेत. पण ते पूर्णपणे चूकीचे नाहीत. पण आमच्यात मिसळून आम्हाला सुधारणेची संधी दिली तर आम्हीही समाजाच्या मुळ प्रवाहात येवू शकू. कला व विज्ञान महाविद्यालयाकडून राबविण्यात येत असलेला उपक्रम त्याचाच एक भाग ठरतो, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन स्मिता जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अजय अभ्यंकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अभिजित बाखडे, शैलेश पोकळे, अक्षय उमरकर, शैलेश मिरासे, अमर आमले, रोशनी जिरापूरे, ज्योती कटाणे, शुभांगी राऊत, साक्षी चौधरी, मयूर गौड आदि रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

दै. मातृभूमी 14 NOV. 2019

जिल्हा संक्षिप्त वृत्त

Principal
Arts & Sci. College
Kurha

Dipawali Snehmilan Sohala

(Pardhi Beda KalagotaTq Tiosa Dist.Amravati)

Dept. of NSS & Home- Economics

Session 2018-19 Date-3/11/2018

Attendance Sheet of Students

Sr.No	Name	Class	Sign
1	Amale Amar Diliprao	B.A.I	
2	Amale Rshikesh Sbhashrao	B.A.I	
3	Bhongade Vaibhav Vilas	B.A.I	
4	Gohatre Vishal Prabhakarrao	B.A.II	
5	Bakhade Abhijit Balkrushan	B.A.II	
6	Dhanke Suraj Vishnuji	B.A.II	
7	Pokale Shailesh Sunilrao	B.A.II	
8	Umratkar Akshay Pramodrao	B.A.II	
9	Uprikar Harish Ganeshrao	B.A.II	
10	Wadi Vrushabh Sureshrao	B.A.II	
11	Borade Punam Subhashrao	B.A.II	
12	Chapare Madhuri Shankarrao	B.A.II	
13	Choudhari Sakshi Subhashrao	B.A.II	
14	Dahe Dipali Gajananrao	B.A.II	
15	Damaye Nisha Anilrao	B.A.II	
16	Ghawat Sarita Rameshrao	B.A.ii	
17	Gorale Snehal Bharatrao	B.A.II	
18	Amale Rutuja Ravindra	B.A.I	
19	Harsodkar Pallavi	B.A.I	
20	Kale Kajal Gajananrao	B.A.II	
21	Kathane Jyoti Sureshrao	B.A.II	
22	Kathane Jyoti Sureshrao	B.A.ii	
23	Raut Shubhangi Dattadas	B.A.II	
24	Sultane Reshma Dhanraj	B.A.II	

Arts & Science College 160 KURHA

Principal
Arts & Sci. College
Kurha

कर्करोग निदान शिबीर(स्त्रियांकरीता)

डॉ. रश्मी नागलकर

डॉ. जयश्री इंगोले

कर्करोग तपासणी

रक्तदान शिबीर

Arts & Science College
160
KURHA

कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

पुण्य नगरी / प्रतिनिधी

कुन्हा : कला व विज्ञान महाविद्यालय कुन्हाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबरदरम्यान चेनुष्ठा येथे पार पडले. शिबिराचा उद्घाटन सोहळा २६ नोव्हेंबर रोजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

उद्घाटन प्रा. प्रदीप खेडकर अध्यक्ष शिक्षण मंच संगाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या हस्ते डॉ. हिमांशू वेद, डॉ. लक्ष्मीकांत भुतडा, डॉ. अरुणराव आमले, सुरेश मुंधडा, सरपंच पद्मा मेहरे, उपसरपंच हरी ढोणे, संदीप आमले यांची उपस्थिती होती. शिबिरामध्ये विविध श्रमदानात्मक उद्बोधनात्मक आणि मनोजरंनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. शिबिरादरम्यान विविध सामाजिक कार्यक्रम पार पडले.याप्रसंगी शिबिरार्थ्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' याची पूर्तता करीत बंधारा बांधला. तसेच शिबिरात मान्यवरांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप २ डिसेंबर रोजी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ. अरुण अडसड यांचे अध्यक्षतेखाली डॉ. प्रशांत शिंगवेकर, समन्वयक रासेयो संगाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. राजेश बुरंगे, जिल्हा समन्वयक संगाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, राजा पिदडी, मा. सुरेशभान मुंधडा, विजय डहाके, पद्मा मेहरे, हरी ढोणे, प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारोपीय कार्यक्रम पार पडला.

दै. पुण्यनगरी १०/१२/१९

दिव्य मराठी ९/१२/२०१९

चेनुष्टा येथे कुन्हा कला व विज्ञान महाविद्यालयाचे 'रासेयो' शिबिर

चेनुष्टा येथे आयोजित रासेयो शिबिराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार अरुण अडसड.

कुन्हा | येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने चेनुष्टा येथे आयोजित रासेयो शिबिरात ३० जणांनी रक्तदान केले. यावेळी विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.

शिबिराचे उदघाटन प्राचार्य अरविंद देशमुख होते. उदघाटन प्रा. प्रदीप खेडकर यांनी केले. डॉ. हिमांशू वेद, डॉ. लक्ष्मीकांत भुतडा, डॉ. अरुण आमले, सुरेश मुधंडा, सरपंच पद्मा मेहरे, उपसरंपच हरिभाऊ ढोणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सात दिवस चाललेल्या या शिबिरात श्रमदान, प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. प्रशांत उरकुडे यांनी स्पर्धा परीक्षा, प्रा. किशोर देशमुख यांनी व्यक्तिमत्व विकास, घनश्याम पिकले यांनी सामाजिक, पौर्णिमा सवाई यांनी ग्रामगीतेवर व्याख्यान दिले. भरत रेठे यांनी सप्तखंजिरीचा लोकजागर कार्यक्रम सादर केला. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात ३० जणांनी रक्तदान केले. डॉ. जयश्री इंगोले, डॉ. नागलकर यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला.शिबिरात ७५ विद्यार्थी सहभागी झाले. समारोपीय कार्यक्रमाला आमदार अरुण अडसड यांची प्रमुख उपस्थित लाभली होती.

चेनुष्ठा येथे रासेयोचे आरोग्य तपासणी शिबिर

कुन्हा : कला व विज्ञान महाविद्यालय कुन्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विशेष शिबिरांतर्गत दत्तम ग्राम चनुष्ठा येथे निःशुल्क कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ डिसेंबर रोजी आयोजित या शिबिरात स्त्रियांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी अंमरावती येथील डॉ.जयश्री इंगोले व डॉ. रश्मी नागलकर या तज्ज्ञ डॉक्टरांना गावासह परिसरातील स्त्रियांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. तसेच महिलांच्या शंकांचे निरसन केले. या यावेळी एकूण ५३ महिलांची तपासणी करण्यात आली. तपासणी केल्यानंतर काही स्त्रियांना समस्या असेल तर त्यांनी तत्काळ दवाखान्यात जावे, असे डॉक्टारांनी सांगितले. या शिबिराचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.स्मीता जाधव, प्रा.अजय अभ्यंकर, प्रदीप पवार व रासेयो स्वयंसेवक यांनी केले.

Science College 160

कला व विज्ञान महाविद्यालयाचे रासेयो शिबीर

चेनुष्ठात पार पडले विविध उपक्रम

श्रमदानातून बंधाऱ्याची निर्मिती

वार्ताहर / ८ डिसेंबर

कुन्हा : भामणगांव रेल्वे येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाचे आठ दिवसीय विशेष शिबीर ग्राम चेनुष्ठा येथे उत्साहात पार पडले. या शिबीरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यासोबतच रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदान करुन गावात बंधाऱ्याची निर्मिती केली.

या शिबीराचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षण मंचाचे अध्यक्ष प्रा. प्रदिप खेडकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख हे होते.

यावेळी डॉ. हिमांशू वेद, डॉ. लक्ष्मीकांत मुंधडा, सरपंचा पद्मा मेहरे, उपसरपंच हरिभाऊ ढोणे, संदिप आमले प्रामुख्याने उपस्थित होते. शिबीरात विविध उद्बोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम पार पडले. मान्यवर वक्त्यांची व्याख्यानेही झालीत. प्रशांत उरकुडे यांनी 'स्पर्धा परिक्षा, रोजगार आणि व्यक्तिमत्व विकास' या विषयावर, प्रा. किशोर देशमुख यांनी 'व्यक्तिमत्व विकास', घनश्याम पिकले यांचे 'उठ युवका जागा हो' या विषयावर, पौर्णिमा सवाई यांचे 'श्रीमद्भगवत गीता : एक जीवनदर्शन' या विषयावर व्याख्यान झाले. सांस्कृतिक सत्रामध्ये सोपान कनेरकर यांनी 'माणूस माझं नाव' या विषयावर अत्यंत प्रभावी कार्यक्रम सादर केला. तर सत खंजेरीवादक भरत रेळे यांच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाने उपस्थितांना प्रभावित केले.

रक्तदान शिबीरात ३० जणांनी रक्तदान केले. महिलाकरिता गर्भाशय व स्तन कर्करोग निदान शिबिराचा महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. जयश्री इंगोले, डॉ. रश्मी नागलकर यांनी ५३ महिलांची तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन केले. रासेयो स्वयंसेवकांनी जलसंधारणासाठी गावात श्रमदान करुन बंधारा तयार केला. या बंधाऱ्याच्या निर्मितीबद्दल गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. गुरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीच्या सिंचनासाठी या बंधाऱ्याचा निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

शिबीराचा समारोप संस्थेचे अध्यक्ष आमदार अरुण अडसड यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी विद्यापीठाचे रासेयो समन्वयक डॉ. प्रशांत शिंगवेकर, जिल्हा समन्वयक डॉ. राजेंद्र बुरंगे, राजाभाऊ पिदाडी, सुरेश मुंधडा, विजय डहाके, पद्मा मेहरे, हरिभाऊ ढोणे, प्राचार्य अरविंद देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता [illegible] आणि प्रा. अजय अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनात ७५ रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.

दै. मातृभूमी दि. 8/12/2018

पाटील गावंड आदी शेतकऱ्यांनी केला आहे.

चनुष्ठा येथे निःशुल्क कॅन्सर तपासणी शिबिर

15/12 2018

कुन्हा : येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विशेष शिबिराअंतर्गत दत्तक ग्राम चनुष्ठा येथे निःशुल्क कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात स्त्रियांची स्तन व गर्भाशयाची तपासणी करण्यात आली. अमरावती येथील डॉ.जयश्री इंगोले व डॉ.रश्मी नागलकर या तज्ज्ञ डॉक्टरांनी स्त्रीयांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी एकूण ५३ महिलांची तपासणी करण्यात आली. या शिबिराचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.स्मिता जाधव, प्रा.अजय अभ्यंकर, प्रदीप पवार व रासेयो स्वयंसेवक यांनी केले. दै. हिन्दुस्थान

ार,1 डिसेंबर 2018

वृत्तकेशरी

रासेयो सेवासंस्कारातून घडावा राष्ट्रसेवा सैनिक

प्रा प्रदीप खेडकर यांचे प्रतिपादन

कुन्हा : श्रीराम शिक्षण संस्था, भामणगाव रेल्वे संचालित कला व विज्ञान महाविद्यालय,कुन्हा द्वारा राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे आयोजन दत्तक ग्राम चनुष्ठा करण्यात आलेले आहे. शिबिराचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा सदस्य तसेच शिक्षण मंच अध्यक्ष मा. प्रा. प्रदीप खेडकर यांच्या शुभहस्ते प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांचे अध्यक्षतेत पार पडले.

उद्घाटन समारंभास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री हिमांशू वेद यांच्यासह डॉ. आमले, सरपंच सौ. पद्माताई मेहरे, श्रीराम शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सुरेशभाऊ मुंधडा, व डॉ. भुतडा व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी उद्घाटनपर संबोधनात प्रा प्रदीप खेडकर यांनी सहभागी विद्यार्थी तसेच ग्रामस्थांशी संवाद साधला. आपल्या वक्तव्यात मत मांडताना ते म्हणाले की, आपल्या भारत देशाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची महत्त्वाची भूमिका आहे. युवाशक्तीला नवचेतना देण्याचे मोठे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या अनेक उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे. सोबतच, युवकांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी करण्याचे आपले महत्त्वाचे कार्य रासेयो द्वारे होत असते. हा प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेला तरुण, देशाबद्दलची प्रामाणिकता, सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव अंगी बाळगणारा असणे, ही एक मफक अपेक्षा महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध उपक्रमाची असते.

तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्र सेवा होय. राष्ट्रसेवा म्हटले तर सर्वप्रथम प्रखर देशप्रेम असलेला सीमेवरील सैनिक आपल्याला आठवतो. आपल्या परिवाराचासुद्ध दूर सीमेवर देशाचे संरक्षण करण्याची जबाबदारी शिरावर समर्थपणे पेलणाऱ्या या सैनिकांच्या परिवाराची, समाजाची आणि संपूर्ण जगबद्दलची जबाबदारी कुणाची असा प्रश्न विचारल्यास एकमेव उत्तर कसोचित सर्वांचे एकच असेल ते म्हणजे हसरकारर.

परंतु, राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सेवा आणि त्याग हे दोन भाव युवकांच्या स्वभावगुणात जडावे व शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्र सेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतूने रासेयो शिबिराचे आयोजन केले जात असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

सीमेवरील सैनिकांसारखी समर्पणाची भावना जोपासणाऱ्या सैनिकांची देशातील समाज रक्षणकर्ती सैन्यफळी या रासेयो स्वयंसैनिकांची निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. देशाबाहेरील शत्रूशी दोन हात करण्यास जसा आपला सीमा सुरक्षा सैनिक समर्थपणे उभा असतो, तसेच अंतर्गत समस्यांशी लढत शासनाच्या विविध सोयी, सुविधा व योजना समाजापर्यंत पोहचण्यासाठी तितकेच समर्थ युवासैन्य रासेयो स्वयंसेवकांचे निर्माण झाल्यास अनेक समस्यांचे समाधान सहज मिळण्याची अपेक्षा संपूर्ण देशाला रासेयोच्या उपक्रमातून असल्याची भावना प्रा. खेडकरांनी व्यावेळी प्रगट केली.

समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अरविंद देशमुख म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या बीजभिंचनातील आठ आरे आठीप्रहर समाजसेवा असा गर्भितार्थ सांगतात तर पार्श्वभूमीमधील लाल रंग हे तरुणांचे साहसाचे रक्त हे राष्ट्र उभारणीसाठी असल्याचे प्रतिक आहे. प्रा. प्रदीप खेडकरांना अपेक्षित या बृहत्सैन्याचे, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी तत्परतेने व सक्षमपणे झटावे. त्याचप्रमाणे, अंधश्रद्धा, निरक्षरता, जातीपातीच्या वंडाळी, अस्वच्छता, पर्यावरण वा वैचारिक प्रदूषण यासारख्या सामाजिक उपद्रव मुल्यांना हद्दपार करून समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आता युध्दस्तरावर प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे व यासाठी रासेयो च्या युवासैन्याची निर्मिती करण्याची निर्णायक वेळ आता आली असल्याचा दुजोरा त्यांनी यावेळी दिला व अशया कार्यपूर्ती साठी सर्व स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी इतर मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमास रासेयो कार्यक्रम अधिकारी, सहकार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे अनेक प्राध्यापक तसेच सहभागी विद्यार्थ्यांसह बहुसंख्येने ग्रामस्थ देखील उपस्थित होते.

श्रमदानातून चेनुष्टा येथे बंधाऱ्याची निर्मिती

◆ कुन्हा, ८ जानेवारी

कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ग्राम चेनुष्टा येथे उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन शिक्षण मंचाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप खेडकर यांच्या हस्ते, तर अधिवक्ता सदस्य हिमांशू वेद यांच्यां अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच पद्मा मेहरे, उपसरपंच हरिभाऊ ढोणे, प्राचार्य अरविंद देशमुख उपस्थित होते.

८ दिवसीय शिबिरामध्ये विविध उपक्रमासोबतच श्रमदान या राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रधान उद्दिष्टाची पूर्तता व्हावी या दृष्टिकोनातून विविध श्रमदान कार्य करण्यात आले. ग्रामस्वच्छता या दैनंदिन उपक्रमाच्या अंमलबजावणी बरोबरच श्रमदान करून ग्रामातील पुलावर बंधारा तयार करून तो पूर्णत्वास नेला. गावकऱ्यांचे सहकार्य घेऊन निर्माण करण्यात आलेल्या बंधाऱ्याकरिता ग्रामस्थांनी श्रमदान करून शिबिरार्थीच्या श्रमाबद्दल असणाऱ्या आत्मियतेचे कौतुक केले.

श्रमदान करुन बंधारा बांधताना विद्यार्थी

शिबिराचा समारोप श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आमदार अरुण अडसड यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, समन्वयक डॉ. प्रशांत शिंगवेकर, डॉ. राजेश बुरंगे, डॉ. अरुण आमले यांच्या उपस्थितीत झाला.

याप्रसंगी चेनुष्ठा गावचे सरपंच, उपसरपंच यांनी शिबिरार्थींनी राबविलेल्या कार्याचे कौतुक केले आणि हा बंधारा शिबिराच्या सेवाकार्याचे प्रतीक आहे, असे मनोगत गावकऱ्यांनी समारोपीय कार्यक्रमात व्यक्त केले.

(तभा वृत्तसेवा)

९ जाने. २०१९ दै. तरुण भारत

रासेयोचे शिबीर गाव विकासाला दिशा देणारे केंद्र

आ.अरुणभाऊ अडसड यांचे प्रतिपादन

वार्ताहर/२ डिसेंबर

कुन्हा : तिवसा तालुक्यातील चेनुष्ठा येथे श्रीराम महाविद्यालय कुन्हा च्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर आयोजित करण्यात आले या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. अरुणभाऊ अडसड व मान्यवराची उपस्थिती होतीराष्ट्रीय सेवा योजनेचे सिद्धांत वाक्य आहे, निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे. रासयोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम असे वर्गीकरण केले आहे. महाविद्यालयाने खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होईल.

हा विश्वाचा नकाशा ।
गावावरून देशाची परीक्षा ।
गाव भंगता येईल अवदशा ।
देशामाजी ।।
म्हणून राष्ट्राचा उध्दार व्हावा असे वाटत असेल तर आधी ग्रामोद्धार झाला पाहिजे.

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून सांगतात व क्रियात्मक रूप देतात. व्यक्तिमत्त्व विकास योजनेचे ध्येय आहे. शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे रासेयो होय. असेही आमदार अरुणभाऊ अडसड यांनी सांगीतले यावेळी प्राचार्य अरविंद देशमुख, सुनिल आखरे, प्रशांत शिंगवेकर, राजेश बुरंगे, सुरेश मुंधडा, विजय डहाके, राजाभाऊ पिदाडी, स्मिता जाधव, विभा देशपांडे, निशा जोशी, किशोर ताकसांडे अजय अभ्यंकर, मनमोहन राठी, सरपंच पदमाताई मेहरे, हरिभाऊ ढोणे, व समस्त चेनुष्ठावासी उपस्थित होते

Principal
Arts & Science College
Kurha

INGOLE HOSPITAL

DR. MRS. JAYSHREE U. INGOLE
M.B.B.S., M.S. (Gen. Surgery)
Ex. Registrar, Sassoon, Hospital, Pune
Ex. Medical Officer, Irwin Hospital, Amravati.
Ex. Lecturer, Dr.P.D.M. Medical College, Amt.
Ex. Hon. Surgon, Dayasagar Hospital, Amravati.

Shyam Nagar, Congress Nagar Road,
Amravati-444 606.
Ph.No. 07212673259

Name _____ Age _____ Wight _____

Rx स्तनाची सोनोग्राफी
निःशुल्क

Date 1-12-2018

① सरला शिकुळा. वाकपांडे - Sonomammogram सोनोग्राफी

② Ashwini मारोतकर.

③ ज्योती पकवि

④ कविता वानखेडे

⑤ रेखाताई आमले

⑥ सुनंदा शेंडे

⑦ सविता रणालेकर

⑧ Aruna पडोळे

INGOLE HOSPITAL

Shyam Nagar, Congress Nagar Road,
Amravati-444 606.
Ph.No. 07212673259

DR. MRS. JAYSHREE U. INGOLE
M.B.B.S., M.S. (Gen. Surgery)
Ex. Registrar, Sassoon, Hospital, Pune
Ex. Medical Officer, Irwin Hospital, Amravati.
Ex. Lecturer, Dr.P.D.M. Medical College, Amt.
Ex. Hon. Surgon, Dayasagar Hospital, Amravati.

Name_____ Age_____ Wight_____

Rx

Date .....

① Reshma Sceltone. - -

② Priya Thombre.

||श्री||

नागलकर नर्सिंग होम व पॉलिक्लिनीक

■ बाल रुग्णालय ■ प्रसुतिगृह ■ सोनोग्राफी सेंटर

शंकर नगर रोड, सुदर्शन बिल्डींग जवळ, अमरावती - ४४४६०७

डॉ. ऋषिकेश श्री. नागलकर
एम.बी.बी.एस., डि.सी.एच
रजि. नं. २००२/०२/४७६
नवजात शिशु व बालरोग तज्ञ

डॉ. (सौ.) रश्मी नागलकर
एम.बी.बी.एस., डि.जी.ओ.
रजि. नं. २००२/०३/१३२५
प्रसुति, वंध्यत्व व स्त्री रोग तज्ञ

website-drnagalkar.com फोन नं. : ०७२१-२५७५६५५, २५६४३२२ (निवास)

वेळ : दु. १ ते २.३०
संध्या ६ ते ९

FREE CAMP

वेळ : स. ११.00 ते ३.00
संध्या ८ ते ९ पर्यंत
Date : .....

1. Sarla Kalpunde — 9049837796.
2. Rukhma B. Dhone -
3. Nalinni More
4. Reeta Ekhar — Pap smear, CBC
5. Chaya Madankar - Pap smear
6. Sangeeta Amle — Pap Smear
7. Sanghamitra Bhagat
8. Ratna Babanrao Padole

दि.....

■ रविवार दवाखाना बंद राहिल. फक्त गंभीर (सिरीयस) रुग्ण तपासण्यात येईल. त्याची फि रु. ३००/- राहील. ■

■ वरील वेळेव्यतिरिक्त इमर्जन्सी असल्यासच रुग्ण तपासणी केली जाईल. ■

डॉक्टरांना दाखविल्याशिवाय औषध घेऊ नये.

Cloths & Blanket Distribution of the Needy & Poor People

Science College
160
KURHA

पुण्य नगरी
सोमवार, ४ फेब्रुवारी २०१९ | अमरावती

कडाक्याच्या थंडीत गरजूंना मायेची ऊब

कला व विज्ञान महाविद्यालयाच्या 'रासेयो'चा उपक्रम

पुण्य नगरी / प्रतिनिधी

कुन्हा : विज्ञान निष्ठा आणि बुद्धीनिष्ठा यांचा समन्वय साधून मानवतावादाची शिकवण देणारे, वंचित वर्गाच्या उत्थानासाठी तळमळीने कार्य करणारे कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विभागाद्वारे समाजोपयोगी उपक्रम राबविला.

संत गाडगेबाबा मिशन नागरवाडी आणि कला व विज्ञान महाविद्यालयाचा रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कुन्हा आणि परिसरातील खेड्यांच्या परिसरात, कुन्हा, दत्तक ग्राम चेनुष्टा, पारधी वस्ती कालागोटा, अशोकनगर, अंजनसिंगी, कौंडण्यपूर, बोरडा येथील गरजूंना प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांचे संकल्पनेतून मायेची ऊब देण्यात आली.

कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जाधव आणि प्रा. अजय अभ्यंकर तसेच स्वयंसेवक यांनी गरीब गरजू आणि वृद्ध स्त्रिया बालक यांना कडाक्याच्या थंडीचे प्रमाण लक्षात घेऊन स्वेटर, जर्कीन अशा गरम कपड्यांचे प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

जवळपास ५०० गरजूंना कपड्यांचे वाटप करून संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीतील एका सूत्राला अंगीकारून आपण्या सामाजिक बांधीलकीचा प्रत्यय दिला. या कार्यात संत गाडगेबाबा मिशन नागरवाडी यांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गरजू ग्रामवासीयांपर्यंत पोहोचविलेली ही मदतीबद्दल गावकऱ्यांनी कृतज्ञता समर्पित केली. कडाक्याच्या थंडीमध्ये आमच्यापर्यंत ही मदत व मदतीचा हात आमच्याकरिता निश्चिच मोलाची आहे, असे मनोगत याप्रसंगी व्यक्त केले.

7/2/16 लोकमत

अंध विद्यालयात राबविला रक्षाबंधनाचा उपक्रम

कुन्हा /प्रतिनिधी

श्रीराम शिक्षण संस्था धामणगांव रेल्वेद्वारा संचालित कला व विज्ञान महाविद्यालय, कुन्हा येथील विद्यार्थ्यांनी डॉ. नरेंद्र भिवापूरकर, अंध विद्यालय, अमरावतीला भेट देऊन तेथील नेत्रहिन विद्यार्थ्यांशी हितगुज साधून तेथे रक्षाबंधन अभिनव उपक्रम राबविला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रधान उद्दीष्ट म्हणजे समाजाच्या गरजांची माहती करुन घेणे त्यांच्या अडचणी समजून घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकिची जाणीव निर्माण करणे हा आहे. हा उद्देश समोर ठेवून रासेयो द्वारे विविध उपक्रम राबविले जातात. अशा अनेक उपक्रमामधील रक्षाबंधनाच्या हा उपक्रम रासेयो स्वयंसेवकानी राबविला.यावेळी रासेयोचे २७ स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी झाले. या प्रसंगी स्वयंसेवकानी विद्यालयातील मुलांची आस्थेने चौकशी केली व राखी बांधून त्यांना खाऊचे वाटप केले.

त्या नेत्रहिन विद्यार्थ्यांची ज्यावेळी संवाद साधला त्यावेळी स्वयंसेवक त्यांच्याशी संमारभ झाले.

हा उपक्रम राबविण्याकरिता विद्यालयामध्ये मुख्याध्यापक इंगोले, विद्यालयातील शिक्षकवृंद तसेच कर्मचारी वृंदाचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम डॉ.अरविंद देशमुख, डॉ.स्मिता जाधव, प्रा.किशोर ताकसांडे, प्रा. हर्षा कांबे, प्रा.अजय अभ्यंकर व विद्यार्थ्यांनी राबविला.

नागरवाडीत गाडगेबाबांच्या दशसुत्रीची अनुभूती

रासेयोचा नाविन्यपूर्ण उपक्रम

पुण्य नगरी / प्रतिनिधी

कुन्हा : संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या संकल्पनेतून रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जाधव, प्रा. अभ्यंकर आणि रासेयो स्वयंसेवक यांनी संत गाडगेबाबाची कर्मभूमी नागरवाडी येथे नाविन्यपूर्ण कार्यक्रम साजरे केले.

यावेळी बाबांच्या दशसुत्रीचा अनुभव आल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.विदर्भ ही खऱ्या अर्थाने संत गाडगेबाबांची कर्मभूमी आणि त्यातही अमरावती जिल्ह्यातील नागरवाडी ही त्यांची कर्मभूमी म्हणून सर्वभूत आहे. त्यांचे अनुयायी बापूसाहेब देशमुख ही धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. शिक्षणाचे धडे गिरविणाऱ्या चिमुकल्या मुलामुलींच्या सोबत आपल्या जीवनातील एक दिवस व्यतीत करावा, त्यांच्याशी स्नेहपूर्ण संवाद साधावा या दृष्टीकोनातून या भेटीचे आयोजन केल्या गेले.

बापूसाहेब देशमुख यांनी विद्यार्थ्यांना गाडगेबाबांच्या कार्याची ओळख त्यांची भजने गाऊन व उद्बोधनातून करुन दिली. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक चौधरी आणि अन्य शिक्षकवृंद यांनी शाळेचा सर्व परिसर, संगणकीकृत वर्गखोल्या या दाखविल्या. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्यासह रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जाधव, प्रा. हर्षा कांबे, डॉ. विभा देशपांडे, प्रा. रंजनसेन शेंडे यांचेसह ४० स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

Principal
Arts & Sci. College
Kurha

2018-19

"नागरवाडी आश्रम शाळेतील स्नेहमिलन"

कर्मयोगी गाडगेबाबांचे अंतिम श्रद्धास्थान नागरवाडी आदिवासी विद्यार्थ्यांसोबत एकदिवस

'मानवता सेवा धर्म' हे ब्रीद आपल्या उक्ती व कृतीद्वारे पटवून देणारे थोर संत कर्मयोगी गाडगेबाबा हे होत. संत गाडगेबाबांनी आपल्या आचार विचाराद्वारे वेळोवेळी शिक्षणाचे महत्व प्रतिपादन केले. शिक्षण हे एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित न राहता समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहचले पाहिजे याकरिता त्यांनी किर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. त्यांनी पुरस्कृत केलेला हा विचार त्यांच्या अनेक अनुयायांनी शिरसावंद्य मानुन त्या दृष्टीने समर्पक कार्य केले. संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी नागरवाडी येथे त्यांच्या स्वप्नांची पूर्तता एका आश्रमशाळेच्या रूपाने साकारलेली दिसून येते.

या आश्रमशाळेला भेट देऊन तेथील आदिवासी मुलांसोबत आपले क्षण व्यतीत करावे या उद्देशाने भेटीचे आयोजन करण्यात आले. या आश्रमशाळेत प्राथमिक ते दहावी पर्यंतचे शिक्षण आदिवासी समाजातील गोरगरिबांचे मुले, मुली घेतात. येथे क्रमिक अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये जीवनापयोगी कौशल्य निर्माण करून ति विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. गाडगेबाबांचे अनुयायी श्री बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूरबाजार तालुक्यातील नागरवाडी येथे ही आश्रमशाळा उभी आहे. अशा या तळागाळातील विद्यार्थ्यांना जीवनपयोगी शिक्षण देत असणाऱ्या व शिक्षणाच्या क्षेत्रात आदर्श प्रस्थापित करणाऱ्या आश्रमशाळेतील विद्यार्थांशी संवाद साधण्याकरिता प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी व आश्रमशाळेतील विद्यार्थी यांचे स्नेहमिलन त्या विद्यार्थ्यांसोबत सहभोजन करण्यात आले. तसेच या आश्रमशाळेतील सर्वात लहान असणारा कृष्णा या विद्यार्थ्याचा वाढदिवस त्याला कपडे व मिठाई देऊन साजरा करण्यात आला.

अशाप्रकारे आपल्या घरादारापासून दर राहून नागरवाडीत शिक्षणाचे धडे गिरविणारया चिमुकल्या मुलांसोबत आपल्या जीवनातील एक दिवस व्यतीत करावा या उद्देशाने महाविद्यालयाने यांनी घडवून आणलेली ही भेट अतिशय अविस्मरणीय ठरली.

Arts & Science College 160 KURHA

2018-2019

Outreach Program – College to community
Sneh Milan at Nagarwadi Ashram School



College Students having lunch with Students from Ashram School

Sneh Milan at Nagarwadi Ashram School

Arts & Science College 160 KURHA

आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना
उदबोधन करतांना
प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख

आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे
स्नेहभोजन

Arts & Science College
160
KURHA

संत गाडगेबाबा मिशन मुम्बई संचालित,

नागरवाड़ी येथील आदिवासी आश्रमशाळेला रासेयो

स्वयंसेवकांची भेट व स्नेहभोजन

दिनांक - ५/१/२०१९

विद्यार्थ्यांचे उपस्थिती पत्रक

अनु.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	स्वाक्षरी
१	अमर दिलीपराव आमले	बी.ए.भाग १	Amol
२	हरीश दिलीपराव बांबल	बी.ए.भाग १	H.D.Bambal
३	रोहित ज्ञानेश्वरराव पाटिल	बी.ए.भाग १	Rohit
४	अभिजित बालकृष्णराव बाखडे	बी.ए.भाग १	Abhade.
५	सौरभ रामकृष्णराव मिरासे	बी.ए.भाग १	Smirase
६	अक्षय प्रमोदराव उमरातकर	बी.ए.भाग २	Akshay
७	कु.स्नेहल भारतराव गोरले	बी.ए.भाग २	Sgorle
८	कु.साक्षी विजयराव चौधरी	बी.ए.भाग २	Schodhri
९	कु.काजल सुनिलराव इंदोरे	बी.ए.भाग २	Kindore
१०	कु.वैशाली शरदराव राउत	बी.ए.भाग १	VRaut
११	कु.आचल संजयराव जडाये	बी.ए.भाग १	Ajadhye
१२	कु. दीपाली गजाननराव डाहे	बी.ए.भाग २	DDahe
१३	कु.नूतन सुरेशराव मेहकरे	बी.ए.भाग १	NMehkare
१४	कु निशा अनिलराव दमाँये	बी.ए.भाग २	NDamaye
१५	शैलेश सुनिलराव पोकळे	बी.ए.भाग २	SPokale
१६	वृषभ सुरेशराव वाड़ी	बी.ए.भाग २	Vwadi
१७	वैभव विलासराव भोंगाड़े	बी.ए.भाग १	VBhogade
१८	विशाल प्रभाकरराव गोहट्रे	बी.ए.भाग १	Vgotre

१९	मयूर कन्हेयालाल गौड़	एम.ए.भाग १	
२०	अनुश्री रविन्द्र वालके	बी.ए.भाग ३	
२१	मारोती गोपालराव यावले	बी.ए.भाग १	
२२	प्रिया सुधाकरराव ठोम्बरे	बी.ए.भाग २	
२३	काजल गजाननराव काळे	बी.ए.भाग २	
२४	सूरज विष्णुजी ढाणके	बी.ए.भाग २	
२५	विशाल सतिशराव मालवीय	बी.ए.भाग १	
२६	कु.सरिता रमेशराव घावत	बी.ए.भाग २	
२७	कु. रोशनी पंजाबराव ठाकरे	बी.ए.भाग २	
२८	कु.पायल संजयराव भोंडे	बी.ए.भाग १	पायल भोंडे
२९	कु.वैष्णवी श्रीकृश्नाव झाडे	बी.ए.भाग १	वैष्णवी झाडे
३०	अनिकेत बालकृष्णराव बाखडे	बी.ए.भाग १	
३१	ऋतुजा रविन्द्रराव आमले	बी.ए.भाग १	ऋतुजा आमले
३२	ऋषिकेष सुभाषराव आमले	बी.ए.भाग १	ऋषिकेश आमले
३३	अक्षय श्रीराम पुन्डेकर	माजी विद्यार्थी	अक्षय पुंडेकर
३४	संतोष भारत शिंगाडे	माजी विद्यार्थी	संतोष शिंगाडे

डॉ.स्मिता जाधव

डॉ. विभा देशपांडे

प्रा. हर्षा काम्बे

प्रा. रंजनसेन शेंडे

Principal
Arts & Sci. College
Rurha

प्राचार्य डॉ.अरविन्द देशमुख

Arts & Science College 160 KURHA

रासेयो उपक्रम सत्र २०१८-१९

पारधी वस्ती कालागोटा येथे दिवाळी स्नेहमिलन

दिवाळीनिमित्याने फराळाचे वाटप करतांना प्राचार्य डॉ अरविंद देशमुख व पालक समिति समन्वयक प्रा. हर्षा कांबे

नागरवाड़ी आश्रम शाळेतील रासेयो स्वयंसेवकांची भेट व स्नेह भोजन

Principal
Arts & Science College
Kurha

Arts & Science College 160 KURHA Principal

2018-19 12 Feb. 2019

"चला समजाऊन घेऊ या"
मेळघाटातील मोहोर पद्मश्री डॉ. रविंद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांच्या सोबत प्रत्यक्ष संवाद

काही लोक जीवन जगात असतांना **'एक ध्येय एक जीवन'** या उक्तीनुसार जगतात आणि आपल्या या जगण्यातून लोकांसमोर आदर्श प्रस्थापित करीत असतात. त्यांच्या या जगावेगळ्याजीवनाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने **"चला, समजाऊन घेऊ या! जगावेगळे ऐसे जीवन"** हा उपक्रम घेण्यात आला. लौकिक जगातील सर्व सुखे हात जोडून उभी असताना, पद, प्रतिष्ठा ,पैसा यांना नाकारून मेळघाटातील आदिवासींच्या सेवेकरिता आपले संपूर्ण जीवन निस्पृह व निरपेक्ष भावनेने समर्पित करणारे, असे मेळघाटातील देवदूत **पद्मश्री डॉ.रवींद्र कोल्हे** आणि **डॉ.स्मिता कोल्हे** यांचे जगावेगळे जीवन समजाऊन घेऊन त्यांच्या आदर्श जीवनाचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा यादृष्टीने **प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख** यांनी **डॉ.कोल्हे** दाम्पत्यांशी संपर्क साधून त्यांना महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याकरिता निमंत्रण दिले.

डॉ.रवींद्र आणि डॉ.स्मिता कोल्हे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने हृदयसंवाद साधताना आपला संपूर्ण जीवनपट उलगडला.आपण कशासाठी जगतो आहोत व कोणाकरिता जगतो आहोत याची जाणीव झाली की, आपल्या जीवनाचे मार्ग आपण शोधू शकतो व आपणास आपले ध्येय गवसते. व त्याक्षणी मिळणारा आनंद हा अवर्णनीय व आत्मिक समाधान देणारा असतो. अशाच प्रकारचा आनंद आम्हा दोघानाही मिळतो आहे. दुर्गम भागातील आदिवासींच्या सेवेकरिता आम्ही दोघांनीही आमच्या जीवनातील सुंदर क्षण घालविले.असे मत व्यक्त केले.अशा प्रकारे नि:स्पृह व निरपेक्ष वृत्तीतून उच्च व उद्दात स्वरूपाचे सेवाकार्य घडते याचा प्रत्यय या प्रसंगी विद्यार्थ्यांना आला. त्यांचा जीवनप्रवास जाणून घेताना विद्यार्थ्यांनी त्यांना विविध प्रश्न विचारलेत. त्या प्रश्नांची या दोघांनीही अतिशय मोकळेपणानी उत्तरे दिलीत.त्याप्रसंगी त्यांच्या या जगावेगळ्या जीवनाची व उच्चविद्याविभूषित असतांनाही त्याच्यातील साधेपणा विनम्रता, अत्मित्याता ध्येयसिद्धीकारिता लागणारा मनोनिग्रह, संयम या गुणांची प्रचिती विद्यार्थ्यांना घेता आली. या प्रसंगी **डॉ. कोल्हे** यांचा शाल, श्रीफळ देऊन तर **डॉ. स्मिता कोल्हे** यांचा साडी -चोळी देऊन सत्कार करण्यात आला.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी सुद्धा विद्या ग्रहण करताना आपले निश्चित ध्येय दृष्टिपूढे देऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी हे या विशेष उपक्रमाद्वारे पटवून देण्यात आले.

Arts & Science College 160 KURHA

विद्यार्थ्यांशी हृदय संवाद साधतांना
पदमश्री डॉ. रवींद्र कोल्हे

डॉ. कोल्हे दाम्पत्याचा सत्कार
करतांना प्राचार्य व शिक्षक

Arts & Science College
160
KURHA

Visit to the college Padma shri Dr. Ravindra Kolhe & Dr.Smita Kolhe

Arts & Science College 160 KURHA

श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे द्वारा संचालित

कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

नॅक द्वारा 'B' श्रेणी प्राप्त

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

आभारपत्र

प्रति,

पद्मश्री मा. डॉ. रवींद्र कोल्हे आणि पद्मश्री मा. डॉ. सौ. स्मिता कोल्हे

महोदय,

उच्च, उदात्त आणि सेवाभावी वृत्ती या ध्येयाने प्रेरित होऊन 'एक ध्येय एक जीवन' या उक्तीला अनसरून आपण आपले संपूर्ण जीवन मेळघाटातील आपल्या आदिवासी बांधवांच्या सेवेकरिता समर्पित केले. ही बाब अत्यंत विलक्षण आहे. आपण आदिवासी बांधवांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडून आणले आहे. हे संपूर्ण समाजाने अनुभवले आहे. या आपल्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने आपणास 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले ही अत्यंत आनंदाची व गौरवाची बाब आहे.

या निमित्याने आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या वतीने आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. आपले हे अद्वितीय सेवाकार्य विद्यार्थी व परिसरातील नागरिकांपर्यंत पोहचावे या उद्देशाने आपण आमच्या विनंतीला मान देऊन आमच्या महाविद्यालयात येऊन अत्यंत आत्मीयतेने आमच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला त्याबद्दल, आम्ही आपले सदैव आभारी राहू !

धन्यवाद !

डॉ. अरविंद देशमुख
प्राचार्य
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
ता. तिवसा जि. अमरावती

डॉ.कोल्हे दांम्पत्यासोबत रासेयोच्या स्वयंसेवकांचा संवाद

प्रतिनिधी / २८ फेब्रुवारी

चिखलदरा - आपण कशासाठी व कोणाकरीता जीवन जगतो आहोत याची जाणीव झाली की आपण, आपल्या जीवनाची निश्चित दिशा ठरवू शकता, हेच आपल्या जीवनाचे सार्थक होय. त्याक्षणी मिळणारा आनंद व आत्मिक समाधान हे शब्दातील असे भावपुर्ण उद्‌गार ज्यांना मेळघाटातील देवदूत म्हणून संबोधिले जाते असे पद्मश्री प्राप्त डॉ.रविंद्र कोल्हे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतांना काढले. कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित 'जगावेगळे ऐसे जिवन' अशा नाविण्यपुर्ण कार्यक्रमात डॉ.रविंद्र कोल्हे व डॉ.स्मिता रविंद्र कोल्हे यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख, सुरेश मुंधडा, सदस्य महाविद्यालय विकास समिती प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अतिशय भावपूर्ण वातावरण संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पद्मश्री प्राप्त डॉ.रविंद्र कोल्हे व स्मिता रविंद्र कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पुढे बोलतांना डॉ.कोल्हे यांनी नि:स्पृह व निरपेक्ष वृत्तीतुन उच्च व उदात्त स्वरूपाची सेवा घडते त्याकरीता तशी अंत:प्रेरणा असावयास हवी माझ्या जीवनातील सुंदर क्षण मी दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या सेवेकरीता घालविले व याकरीता माझ्या पत्नीने पावलोपावली संघर्ष करीत मदतच केली नाही तर या सेवाकार्यात त्या समर्पित झाल्यात असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी स्मिता कोल्हे यांनी आपले जीवन अनुभव व्यक्त करीत असतांना डॉ.अरविंद देशमुख यांनी एक ध्येय एक जिवन या उक्तीला अनुसरून आदिवासींच्या सेवे करीता व उत्थानाकरीता अहोरात्र झटणारे कोल्हे दाम्पत्य असामान्य असुन त्यांचे कार्य विलक्षण आहे. वैद्यकिय क्षेत्रात उच्चविद्याविभूषीत असूनही कशाचाही मोह न ठेवता केलेल्या कार्याची नोंद घेवून सरकारने त्यांना 'पद्मश्री' देवून गौरव केला ही बाब अत्यंत सन्मानाची आनंदाची आहे. असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका कार्यक्रम अधिकारी डॉ.स्मिता जाधव यांनी विशद केली. रोसेयोचे ब्रिदवाक्य 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' याचा प्रत्यय याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ.कोल्हे दाम्पत्यांच्या कार्यातुन घेतला. कार्यक्रमाचे आभार प्रा.अजय अभ्यंकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला कुऱ्हा गावातील अनेक ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, सर्व विद्यार्थी उत्फुर्तपणे सहभागी झाले. महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी देखील कार्यक्रमाला उपस्थित होते.

डॉ.रविंद्र कोल्हे व डॉ.स्मिता कोल्हे यांचा विलक्षण आणि अभूतपुर्व असा जीवनप्रवास, त्यांचा साधेपणा बघून उपस्थितांना 'जगावेगळे ऐसे जीवन' याचा जीवनप्रवास, याचा परिचय झाला. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम व राष्ट्रवंदनाने झाली.

Arts & Science College 160 KURHA

कुऱ्हा येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी व ज्येष्ठांचा सत्कार

प्रतिनिधी / १४ जानेवारी

कुऱ्हा : श्रीराम शिक्षण संस्था धामणगाव रेल्वेद्वारा संचालित कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा येथे राष्ट्रीय सेवा योजनाद्वारा संत गाडगेबाबांची पुण्यतिथी ज्येष्ठ नागरिकांचा तसेच अवयव दानाचा संकल्प करणारे नागरिक यांचा सत्कार करून साजरी करण्यात आली. या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरूण अडसड, प्रमुख अतिथी डॉ.शोभाताई लोंढे, माजी प्राचार्य, शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावती, बापुराव देशमुख, मनोहर किरवटे, घनश्याम मेश्राम सचिव श्रीराम शिक्षण संस्था, सुभाष देशमुख संचालक, श्रीराम शि.सं.विजय डहाके सदस्य महाविद्यालय विकास समिती, कुऱ्हा व कुऱ्हा गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

ज्येष्ठांचा सत्कार करताना अरूण अडसड

या सत्काराच्या कार्यक्रमाला ४० जणांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन प्रा.रंजन सेन शेंडे, डॉ.निशा जोशी यांनी, तर आभार डॉ.स्मिता जाधव, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ.सुनिल आखरे, डॉ. विभा देशपांडे, डॉ. उमेश राठी, प्रा. किशोर ताकसांडे, प्रा.हर्षा कांबे, प्रा.अजय अभ्यंकर, प्रा. निलीमा बेहरे, प्रा.अंकुश अंबुरे, मनमोहन राठी, सुरेश अंबापुरे, दिलीप पाटील, प्रदीप पवार, विलास भोंगाडे, गजान बेहरे, राजू लोहे यांच्यासह सर्व रासेयो स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

दै. देशोन्नती १४/१/१९

Principal
Arts & Sci. College
Kurha

Arts & Science College 160 KURHA

श्रीराम शिक्षण संस्था धामाणगांव रेल्वे द्वारा संचालित

कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा,

"Human rights are women's rights,

'महिला समिती'

एवं

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग नई दिल्ली

(NATIONAL HUMAN RIGHTS COMMISSION)

द्वारा आयोजित

एव दिवसीय कार्यशाला अहवाल

(ONE DAY BASIC TRAINING PROGRAMME'S)

विषय

महिलाओ के अधिकार

(RIGHT'S OF WOMEN)

दिनांक २१ फरवरी २०१९

डॉ.अरविंद व. देशमुख

प्राचार्य

कला व विज्ञान महाविद्यालय

कुऱ्हा

डॉ.निशा सु. जोशी

सह- समन्वयक

महिला समिती

डॉ.विद्या प्र. देशपांडे

समन्वयक

महिला समिती

Arts & Science College 160 KURHA

Principal
Arts & Science College
Kurha

कार्यशाला अहवाल - २०१८-१९

'भारतीय समाजा एवं संस्कृति उत्थान एवं पतन के विभिन्न दौर से गुजरी है।'वैदिक युग के बाद भारतीय समाज के निवारण के लिये अनेक प्रयत्न शुरू हुये, किन्तु वैदिक युगीन गौरव नही लौट सका। मध्य काल में भारतीय समाज अनेक कुरूतियों का शिकार बन गया। भारतीय समाज की दिशा दयनीय हो गयी।

उन्नीसवी शताब्दी में जहाँ विविध सामाजिक कुरीतियाँ दिखाई देती है, जैसे की बाल विवाह, दहेज प्रथा, सतीप्रथा, पर्दा प्रथा, स्त्रियों मे अशिक्षा, स्त्रियों का शोषण इत्यादी। वही दुसरी ओर भारतीय समाज में सुधार आंदोलनो द्वारा इस स्थिती में सुधार करते हुए भी दिखते है। और समाज में व्याप्त अनेक कुरूतियों तथा अंध विश्वासो को दुर करने हेतु जो नई चेतना उत्पन्न हुई, उसे "पुर्नजागरण" की संज्ञा दी गई। समाज सुधारको के अतिरिक्त कुछ प्रबुद्ध भारतीयों द्वारा स्त्रियों की दशा सुधारने व सामाजिक कुरूतियों को समाप्त करने के लिए व्यक्तिगत प्रयास, संस्थात्मक रुप से भी प्रयास किये गये, ऐसे ही अनेक प्रयासो की फलश्रुती माने संयुक्तराष्ट्र (United Nation) ये अंतराष्ट्रीय संघटन की स्थापना २४ अक्टूबर १९४५ को की गई इसके ६ विभाग है। उनमें से एक विभाग माने आर्थिक व सामाजिक परिषद (The Economic & Social Council-ECOSOC) ये परिषद सभी मानव जाती को मुलभूत स्वतंत्रता एवं मानवी अधिकार समान रुप से प्राप्त हो, ये प्रदान करते समय धर्म, वंश, जात, लिंग, भाषा इत्यादि के आधार पर भेदभाव न हो इस हेतु कार्य करती है उसी के अनुरुप हमारे देश में भी राष्ट्रीय मानवाधिकार अयोग की स्थापना कि गई है। जो कि सभी मानव जाती को समान अधिकार व स्वतंत्रता प्राप्त है या नही इसका निरिक्षण कर उन्हे प्रदत्त करने में महत्वपूर्ण भुमिका निभाती है।

अनेक वर्षो से शोषित रहीं महिलाओं के रक्षण, व उनमें जागृती निर्माण करने के उद्देश्य राष्ट्रीय मानवाधिकार आयोग द्वारा विविध कार्यक्रम, चर्चा सत्र, परिसंवाद इत्यादि कार्यक्रम प्रतिवर्ष आयोजित किये जाते है। अत: राष्ट्रीय मानवाधिकार आयोग नई दिल्ली एवं कला व विज्ञान महाविद्यालय कुन्हा, (संत गडगे बाबा अमराती विश्वविद्यालय संलग्नित) महिला समिती इनके संयुक्त सहकार्य से दि. २१ फरवरी २०१९ को एक दिवसीय कार्यशाला

Arts Science & Commerce College * KURHA * 160

का आयोजन महिलाओ के अधिकार इस विषय पर सम्पन्न हुई, कार्यशाला का 'अहवाल' प्रस्तुतीकरण इस प्रकार है।

सर्वप्रथम भारत माता के प्रतिमा का पूजन एवं दीप प्रज्वलन माननीय अतिथी गणो द्वारा किया गया, इस कार्यशाला में अध्यक्ष पद पर महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख सर विराजमान थे, तो कार्यशाला का उद्घाटन ॲड. डॉ. सुप्रभा यादगीरवार मॅडम (विधी महाविद्यालय, यवतमाल) इनके करकमलोद्वार इनके करकमलो द्वारा सम्पन्न हुआ, तो प्रमुख अतिथी के रूप में डॉ. अर्चना रोठे, (मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन सुत गिरणी धामानगांव रेल्वे), श्री. सुरेशजी मुंधडा (संचालक श्रीराम शिक्षण संस्था धामानगांव, रेल्वे) ये उपस्थित थे।

कार्यशाला के उद्घाटन के अवसर पर ॲड. सुप्रभा यादगीरवार इन्होने उद्घाटक के रुप में अपने विचार रकते हुए कहा कि, महिलाओं ने किसी भी प्रकार का अत्याचार न सहते, अपने बचाव के लिए कानून का सहारा लेना चाहिए, वर्तमान में भी महिलाएँ अत्याचार सहन करते रहती है, लेकिन कानून का सहारा नही लेती, कानून महिलाओं के संरक्षण के लिए बने हुए है। सन्माननीय अतिथी डॉ. अर्चना रोठे अपने भाषण में महिलाओं की पूर्व की परिस्थिती में हुई सुधारणा पर प्रकाश डाला एवं हिंमत एवं धैर्य से आगे बढे यह संदेश दिया। अध्यक्षीय भाषण में प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख इन्होने कहा की 'जहाँ चाह वहाँ राह' अर्थात इच्छाशक्ति के बल पर हम अपना विकास अच्छी तरह से कर सकते है तभी तो महिलाओं ने अनेक क्षेत्रो में उडान भरी है।

प्रथम सत्र में प्रमुख अतिथी के रुप मे ॲड. प्राजक्ता मशीदकर अमरावती ये थी, इन्होने भारत के संविधान के तिसरे विभाग में अनुच्छेद १२ से ३५ में जो मुलभूत अधिकार प्रदान किये है, उनका उपयोग कर हम महिलाएँ अपना किस प्रकार विकास कर सकते है इस पर अपने विचार व्यक्त किये, अध्यक्ष के रुप में प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख सर इन्होने मुलभूत अधिकारो का महत्व विशद किया।

द्वितीय सत्र में डॉ. शोभा रोकडे मॅडम इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती इन्होने महिलाओं पर होने वाले अत्याचार, हिंसाचार का प्रतिकार कर उसे किस प्रकार रोका जा सकता है, साथ ही घरेलू हिंसाचार, बलात्कार, एव कार्यालयीन क्षेत्रो में होने वाला स्त्रियों

Arts Science College 160 KURHA

का लैगिक शोषण, इन सबका प्रतिरोध कर, राष्ट्रीय व राज्य महिला आयोग द्वारा जो विि क्षेत्रों में महिला समिती गठित की है, उसमें तक्रार कर अपने साथ किया गया अन्याय हम कर सकते है, इस संबंध में मार्गदर्शन किया, अध्यक्षीय भाषण में प्राचार्य डॉ. अरविंद देशम सर इन्होंने महिलाओं को अन्याय के विरुद्ध लडने का महत्वपूर्ण संदेश दिया। उसी प्रकार प्रमुख अतिथी श्रीमती निलिमा काले (यशवंतराव प्रशासकीय प्रबोधिनी) ये महिलाओ समस्या एवं उपाय इस संबंधी सामाजिक कार्य करती है। उन्होंने अपने विचारो को प्रस करते हुए कहा कि सभी माताओं से मेरा अनुरोध है कि उन्होने अपने सुपुत्री के विवाह बाद उनके घर गृहस्थी में ज्यादा हस्तक्षेप नही करना चाहिए, क्योकि उसका परिणाम यह रहा है कि, तलाक की समस्या उग्र रुप धारण कर रही है। ये अनुभव हमें समाजिक क्षेत्र कार्य करते हुए आया।

तृतीय सत्र में कु. पाणेरी पासड (उम्र २२ वर्ष) जो कि दिव्यांग होते हुए तैराकी उसने ५० सुवर्णा पदक राज्य व राष्ट्रीय स्तर के प्राप्त किये। उसमे अथांग इच्छा शक्ति दर्शन सभी महिलाओं को देखने को मिले. जिससे महिलाएँ काफी प्रभावित हुई, और वि करने पर मजबूर हो गई की, यदि महिलाओ नचे विचार कर कदम बढाए तो महिलाएँ कि भी क्षेत्र में पिछे नही। कु. पाणेरी के यश में उसके माता पिता का अनमोल योगदान अध्यक्षीय भाषण में मा. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख सर इन्होंने अपने विचार व्यक्त क हुए कहा कि धन्य ये स्त्री शक्ती इन्होने अगर मन में सोच लिया तो ये संधि का सोना क ही रहती है।

समारोपीय समारंभ में प्रमुख अतिथी के रुप में श्रीमती संगीता पवार (सामाजि कार्यकर्ता) थी। उन्होने अपने विचार व्यक्त करते हुये कहा कि महिलाओं ने अपने विच को एवं समस्याओं को महिला समिती के सामने रखते हुए उन समस्याओं का निवारण क चाहिए, एवं विकास की और अग्रेसर होना चाहिए। इस कार्यशाला में आसपास के परिक्षेत्र कार्य कर रही (सामाजिक कार्यकर्ता) महिलाओ का भी सत्कार महाविद्यालय के प्राच डॉ. अरविंद देशमुख सर इन्होने किया, ये सत्कारमुर्ती - श्रीमती पुष्पा कोकाटे, श्रीमती मंग आमले, श्रीमती सुनीता उटाळे, श्रीमती पुष्पा कडव, श्रीमती अनिता बिसने, श्रीमती संगी पवार,

Arts & Science College 160 KURHA

इस कार्यशाला की प्रस्तावना डॉ. निशा जोशी इन्होंने कि, तो आभार महिला समिती की समन्वयक डॉ. विभा देशपांडे इन्होने माना संचालक कु. रोशनी डोंगरे इन्होने किया। इस कार्यशाला मे काफी संख्या मे महिलाएँ, प्राध्यापक उपस्थित थे। कार्यशाला यशस्वी करने हेतु डॉ. सुनील आखरे, डॉ. स्मिता जाधव, डॉ. किर्ती गांधी, डॉ. उमेश राठी, प्रा. किशोर ताकसांडे, प्रा. अजय अभ्यंकर, प्रा. रंजन शेंडे, श्री. मनमोहन राठी, श्री. सुरेश अंबापुरे, श्री. प्रदीप पवार, श्री. विलास भोंगाडे, सौ. सावित्री आत्राम, श्री. राजेश लोहे, कु. वैष्णवी डफले, शुभम बावने, निशिकांत ठाकरे, श्रीधर चव्हाण, कु. माधुरी चाफरे, कु. वैशाली कुन्हाडे, कु. पल्लवी हरसोडकर, कु. अनुश्री जिरापुरे इत्यादी विविध लोगो का सहकार्य प्राप्त हुआ, कार्यक्रम के अंत में पुलवामा यहाँ शहीद हुए सैनिको को श्रद्धांजली अर्पित की गई व कार्यक्रम का समारोप राष्ट्रगीत द्वारा किया कया गया।

धन्यवाद!

डॉ.अरविंद व. देशमुख
प्राचार्य
कला व विज्ञान महाविद्यालय
कुन्हा

Principal
Arts & Sci.College
Kurha,Tq.Tiosa

डॉ.निशा सु. जोशी
सह- समन्वयक
महिला समिती

डॉ.विभादेशपांडे
समन्वयक
महिला समिती

Arts & Sci. College 160 KURHA

मा. प्राचार्य ॲड. डॉ. सुप्रभा यादगीरवार उद्घाटन समारंभ मे मार्गदर्शन करते हुए.



मा. डॉ. अर्चना रोठे महिलाओको उद्बोधन करते हुए.

Science College
160
KURHA

मा. ॲड. प्राजक्ता मशीदकर महिलाओको मार्गदर्शन करते हुये (प्रथम सत्र)

मा. डॉ. शोभा रोकडे महिलाओको उद्‌बोधन करते हुए. (द्वितीय सत्र)

Science College
160
KURHA

मा. निलीमाताई कराले महिलाओको उद्‌बोधन करते हुए.

कु. पानेरी पासड (दिव्यांग तैराकी मे ५० सुवर्ण पदक प्राप्त) का शाल और श्रीफल देकर सन्मान करते हुए. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख एवं मान्यवर (तृतीय सत्र)

Science College
160
KURHA

अध्यक्षिय मनोगत व्यक्त करते हुए मा. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख

आभार व्यक्त करते हुए महिला समिती समन्वयक डॉ. विभा प्र. देशपांडे

Arts & Science College
160
KURHA



